# यावल महाविद्यालयात व्याख्यान संपन्न

यावल (प्रतिनिधी)- येथील जळगाव जिल्हा मराठा विद्या प्रसारक सहकारी समाज संचलित कला वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयात आय. क्यू. ए.सी.

विभाग व संगणक विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने *ॲडव्हान्स कॉम्प्युटर्स स्किल* या विषयावर सौ. शुभांगी बडगुजर व यश बडगुजर यांचे व्याख्यान प्राचार्या डॉ. संध्या सोनवणे यांच्या मार्गदर्शनाखाली संपन्न झाले.

कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे उपप्राचार्य प्रा. एम. डी. खैरनार होते तर प्रमुख अतिथी म्हणून उपप्राचार्य प्रा. संजय पाटील, डॉ. आर. डी.पवार उपस्थित होते.

सौ. बडगुजर यांनी म्हटले की जग हे आधुनिकतेकडे वाटचाल करत असून त्या प्रवाहात चालणे हे विद्यार्थ्यांची जबाबदारी आहे. यश बडगुजर यांनी मार्गदर्शन केले की संगणकाबद्दल आधुनिक कौशल्य आत्मसात करणे हे गरजेचे आहे. याबाबत यांनी सखोल मार्गदर्शन केले.कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. सी. के. पाटील यांनी केले तर आभार संगणक विभाग प्रमुख प्रा. ईश्वर पाटील यांनी मानले.


कला, वाणिज्य व विज्ञान
पंडित जवाहरलाल नेहरू जयंती
'बालदिन'


ज.जि.म.वि.प्र. सह. समाजाचे
कला, वाणिज्य व विज्ञान
हाविद्यालय, यावल
युवती सभा उद्‌घाटन
अध्यक्ष - प्राचार्य डॉ. संध्या सोनवणे
प्रमुख पाहुणे - श्रीमती प्रतिभा पाटील

| मूल्य : ४.०० रुपये | संस्थापक संपादक : बाळ ठाकरे

ज्वलंत हिंदुत्वाचा पुरस्कार करणारे एकमेव मराठी दैनिक

सामना

यावल - " दैनिक सामना " दि. ०२/ ०९ / २०२२ ( ता. प्रतिनिधी - तेजस यावलकर )

# यावल येथील महाविद्यालयात व्याख्यान उत्साहात

**यावल** : येथील जळगाव जिल्हा मराठा विद्या प्रसारक सहकारी समाज संचालित कला वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयात आय.क्यू.ए.सी. विभाग व संगणक विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने ॲडव्हान्स कॉम्प्युटर्स स्किल या विषयावर शुभांगी बडगुजर व यश बडगुजर यांचे व्याख्यान प्राचार्या डॉ. संध्या सोनवणे यांच्या मार्गदर्शनाखाली झाले. अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे उपप्राचार्य प्रा. एम. डी. खैरनार होते तर प्रमुख अतिथी म्हणून उपप्राचार्य प्रा. संजय पाटील, डॉ. आर. डी.पवार उपस्थित होते.